www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**A**

# Paper-II
# HISTORY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ................................................

2. (Signature) ..........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

# JUN - 10225


**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.

   **Example :** where (B) is the correct response.

   Following wrong methods should not be used as they are not recognised by scanning machine in digitized assessment. Candidate using such method will be responsible for their loss.

   WRONG METHODS


   

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.

   **उदा. :** जर (B) हे योग्य उत्तर असेल तर.

   खालील चुकीच्या पद्धती वापरू नये, कारण डिजिटाइज्ड (Digitized) मूल्यांकनात स्कॅनिंग मशीन त्यांना ओळखत नाही. त्या पद्धती वापरून नुकसान झाल्यास त्यास विद्यार्थीच जबाबदार असतील.

   WRONG METHODS

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

JUN - 10225/II—A

# History
## Paper II
# इतिहास
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which of the following religious teachers was not contemporary to the Buddha ?
   (A) Sanjay Belatthiputra
   (B) Mogaliputta Tissa
   (C) Prakruddha Katyayana
   (D) Purna Kashyapa

2. What was the capital of Magadh Mahajanapada during the time of king Ajatashatru ?
   (A) Kaushambi
   (B) Rajagriha
   (C) Pataliputra
   (D) Vaishali

3. Which of the following is not one of the principal types of Agni mentioned in the Rigveda ?
   (A) Dakshina
   (B) Garhapatya
   (C) Ahavaniya
   (D) Havyavaha

1. खालीलपैकी कोणते धर्मगुरू बुद्धांच्या समकालीन नव्हते ?
   (A) संजय बेलट्ठीपुत्र
   (B) मोगलीपुत्र निस्स
   (C) प्रक्रुद्ध कात्यायन
   (D) पूर्ण काश्यप

2. सम्राट अजातशत्रूंच्या कालखंडात मगध महाजनपदाची राजधानी काय होती ?
   (A) कौशांबी
   (B) राजगृह
   (C) पाटलिपुत्र
   (D) वैशाली

3. खालीलपैकी कोणता ऋग्वेदात वर्णित अग्नीच्या तीन प्रमुख प्रकारांपैकी एक प्रकार नाही ?
   (A) दक्षिणा
   (B) गार्हपत्य
   (C) आहवनीय
   (D) हव्यवाह

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



4. Which of the following is not an absolute dating method ?
   (A) Stratigraphy
   (B) Palaeomagnetic method
   (C) Obsidian method
   (D) Dendrochronology

5. Which of the following is not a useful source of understanding the history of king Harshavardhana ?
   (A) Si-Yu-Ki
   (B) Banskheda Copper Plate
   (C) Madhuban Copper Plate
   (D) Meharauli Pillar Inscription

6. Parishishtaparvana which is one of the important textual sources of the Mauryan history was written by ......
   (A) Vishakhadatta
   (B) Hemachandra
   (C) Jinasena
   (D) Gunabhadra

7. The Periyapuranam is an important source of social and religious history of early medieval ..................
   (A) Telangana
   (B) Tamil Desha
   (C) Andhra Desha
   (D) Tulunadu

4. खालीलपैकी कोणती निश्चित कालमापन पद्धती नाही ?
   (A) स्तरशास्त्र
   (B) पुराचुंबकीय कालमापन
   (C) ऑबसिडियन कालमापन
   (D) वृक्ष-वलय कालमापन

5. सम्राट हर्षवर्धनाचा इतिहास जाणून घेण्यासाठी खालीलपैकी कोणते साधन उपयुक्त नाही ?
   (A) सि-यु-की
   (B) बांसखेडा ताम्रपट
   (C) मधुबन ताम्रपट
   (D) मेहरौली स्तंभालेख

6. मौर्यांच्या इतिहासाच्या प्रमुख साधनांपैकी एक साधन असलेले परिशिष्टपर्वन .................. यांनी लिहिले होते.
   (A) विशाखादत्त
   (B) हेमचंद्र
   (C) जिनसेन
   (D) गुणभद्र

7. पेरियपुराणम् हे प्रारंभिक मध्ययुगीन ........... च्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासाचे प्रमुख साधन आहे.
   (A) तेलंगण
   (B) तामिल देश
   (C) आंध्र देश
   (D) तुळूनाडू

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



8. Which of the following texts throws light on the history of Paramaras ?
   (A) Mudrarakshasa
   (B) Navasahasankacharita
   (C) Harshacharita
   (D) Gaudavaho

9. Which of the following sites is not associated with Harappan culture ?
   (A) Alamgirpur
   (B) Koldihwa
   (C) Banawali
   (D) Surkotda

10. Which of the following sites does not represent regional Chalcolithic culture ?
   (A) Malwa
   (B) Jorwe
   (C) Kayatha
   (D) Chirand

11. Which of the following Vakataka kings was mentioned as Bhavanaga-dauhitra ?
   (A) Rudrasena I
   (B) Harishena
   (C) Devasena
   (D) Pravarasena I

8. खालीलपैकी कोणता ग्रंथ परमारांच्या इतिहासावर प्रकाश टाकतो ?
   (A) मुद्राराक्षस
   (B) नवसाहसांकचरित
   (C) हर्षचरित
   (D) गौडवहो

9. खालीलपैकी कोणते स्थळ हडप्पा संस्कृतीशी निगडित नाही ?
   (A) आलमगीरपूर
   (B) कोलडिहवा
   (C) बनवाली
   (D) सूरकोटडा

10. खालीलपैकी कोणते स्थळ प्रादेशिक ताम्रपाषाण संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करीत नाही ?
   (A) मालवा
   (B) जोर्वे
   (C) कायथा
   (D) चिरांद

11. खालीलपैकी कोणत्या वाकाटक सम्राटाचा भवनाग दौहित्र असा उल्लेख आढळून येतो ?
   (A) प्रथम रुद्रसेन
   (B) हरिषेण
   (C) देवसेन
   (D) प्रथम प्रवरसेन

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



12. Which of the following Gupta kings was the first king who used the title Maharajadhiraja for the first time ?
(A) Shri Gupta
(B) Chandragupta I
(C) Ghatotkacha
(D) Samudragupta

13. Which of the following inscriptions of the Mauryan King Ashoka mentions sections of Buddhist texts ?
(A) Brahmagiri
(B) Maski
(C) Rupanath
(D) Bhabru

14. Which of the following ganarajyas is not mentioned in the Allahabad Pillar inscription of the Gupta King Samudragupta ?
(A) Audumbara
(B) Yaudheya
(C) Arjunayana
(D) Prarjuna

15. Which of the following sites does not have major rock edicts of the Mauryan King Ashoka ?
(A) Mansehra
(B) Jaugada
(C) Dhauli
(D) Maski

12. खालीलपैकी कोणत्या गुप्त सम्राटाने सर्वप्रथम महाराजाधिराज ही उपाधी धारण केली ?
(A) श्री गुप्त
(B) प्रथम चंद्रगुप्त
(C) घटोत्कच
(D) समुद्रगुप्त

13. मौर्य सम्राट अशोक यांच्या खालीलपैकी कोणत्या शिलालेखात बौद्ध ग्रंथातील विभागांचा उल्लेख आहे ?
(A) ब्रम्हगिरी
(B) मास्की
(C) रूपनाथ
(D) भाब्रू

14. गुप्त सम्राट समुद्रगुप्त यांच्या अलाहाबाद स्तंभालेखात खालीलपैकी कोणत्या गणराज्याचा उल्लेख आढळून येत नाही ?
(A) औदुंबर
(B) यौधेय
(C) अर्जुनायन
(D) प्रार्जुन

15. खालीलपैकी कोणत्या स्थळावरून मौर्य सम्राट अशोक यांचा प्रमुख शिलालेख संच प्राप्त होत नाही ?
(A) मनसेहरा
(B) जौगड
(C) धौली
(D) मास्की

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



16. The Rabataka inscription is written in ..................... script.
    (A) Brahmi
    (B) Greek
    (C) Kharoshthi
    (D) Saindhavi

17. According to the Junagadh inscription of king Rudradaman I, king Rudradaman defeated ......... .
    (A) Arjunayanas
    (B) Abhiras
    (C) Yaudheyas
    (D) Audumbaras

18. Which of the following kings prominently figures in the Silappadikaram ?
    (A) Kulottunga I
    (B) Senguttuvan
    (C) Rajendra I
    (D) Rajaraja I

19. Which of the following Satavahana kings completely exterminated the Kshaharatas according to Nashik Cave 3 inscription ?
    (A) Vashishthiputra Siri Yajna Satakarni
    (B) Gautamiputra Satakarni
    (C) Vashishthiputra Pulumavi
    (D) Vijaya Satakarni

16. रबाटक शिलालेख ............ लिपीत लिहिलेला आहे.
    (A) ब्राम्ही
    (B) ग्रीक
    (C) खरोष्ठी
    (D) सैंधवी

17. सम्राट प्रथम रुद्रदामन यांच्या जुनागढ शिलालेखानुसार, सम्राट रुद्रदामन याने ......... यांचा पराभव केला.
    (A) अर्जुनायन
    (B) अभीर
    (C) यौधेय
    (D) औदुंबर

18. सिलप्पदिगारम यात खालीलपैकी कोणत्या राजाचा प्रामुख्याने उल्लेख प्राप्त होतो ?
    (A) प्रथम कुलोत्तुंग
    (B) सेनगुट्टुवन
    (C) प्रथम राजेंद्र
    (D) प्रथम राजराज

19. नाशिक लेणी क्रमांक ३च्या शिलालेखानुसार खालीलपैकी कोणत्या सातवाहन सम्राटाने क्षहरातांचे पूर्णत: उन्मूलन केले ?
    (A) वशिष्ठीपुत्र सिरी यज्ञ सातकर्णी
    (B) गौतमीपुत्र सातकर्णी
    (C) वशिष्ठीपुत्र पुळूमावी
    (D) विजय सातकर्णी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



20. Which of the following deities is not mentioned in the Naneghat cave inscription of the Satavahana queen Naganika ?

(A) Vasudeva

(B) Rudra

(C) Indra

(D) Sankarshana

21. Who is the author of Vikramankadevacharitra ?

(A) Kalhana

(B) Bilhana

(C) Vikramankadeva

(D) Gunavarma

22. Who was a poetess in the Bhakti Sect ?

(A) Nammalwar

(B) Andal

(C) Tirumarkai Alwar

(D) Appar

20. सातवाहन सम्राज्ञी नागनिका यांच्या नाणेघाट शिलालेखात खालीलपैकी कोणत्या देवतेचा उल्लेख नाही ?

(A) वासुदेव

(B) रूद्र

(C) इंद्र

(D) संकर्षण

21. विक्रमांकदेवचरित्र कोणी लिहिले ?

(A) कल्हण

(B) बिल्हण

(C) विक्रमांकदेव

(D) गुणवर्मा

22. खालीलपैकी कोण भक्तिमार्गातील कवयित्री होती ?

(A) नम्मलवार

(B) अंदाल

(C) तिरुमरकाई अलवार

(D) अप्पर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



23. Which Rashtrakuta King adopted the title 'Conquerer of Kanchi and Tanjavur' ?
    (A) Krishna I
    (B) Krishna II
    (C) Krishna III
    (D) Govinda III

24. Which of the following styles of temple architecture is known as a mixed style ?
    (A) Nagara
    (B) Dravida
    (C) Vesara
    (D) Kalinga

25. During the reign of which king did Huen Tsang Visit Kanchi ?
    (A) Narsimhavarman I
    (B) Mahendravarman II
    (C) Parmeshwarvarman I
    (D) Nandivarman

23. 'कांची व तंजावूरचा विजेता' अशी पदवी कोणत्या राष्ट्रकूट राजाने घेतली ?
    (A) कृष्ण I
    (B) कृष्ण II
    (C) कृष्ण III
    (D) गोविंद III

24. मंदिर स्थापत्याची मिश्र शैली म्हणून कोणती शैली ओळखली जाते ?
    (A) नागर
    (B) द्रविड
    (C) वेसर
    (D) कलिंग

25. कोणत्या राज्यकर्त्याच्या काळात ह्युएनत्संग याने कांचीला भेट दिली ?
    (A) नरसिंहवर्मन I
    (B) महेंद्रवर्मन II
    (C) परमेश्वरवर्मन I
    (D) नंदीवर्मन

26. Match the pairs :

**List I**

(*a*) Saliya Nagaram

(*b*) Sankarappadi Nagaram

(*c*) Paraga Nagaram

(*d*) Vaniya Nagaram

**List II**

(1) Textile traders' organization

(2) Maritime traders' organization

(3) Oil-ghee suppliers' organization

(4) Oil traders' organisation

**Options :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (2) | (1) | (4) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (1) | (3) | (2) | (4) |
| (D) | (4) | (1) | (2) | (3) |

27. Which of the following rulers is the author of 'Mattavilasaprahasana' ?

(A) Mahendravarman-I

(B) Bhoja

(C) Amoghavarsha

(D) Pulkeshi-II

26. जोड्या लावा :

**सूची I**

(*a*) सलिया नगरम

(*b*) शंकरप्पदी नगरम

(*c*) पारग नगरम

(*d*) वनिय नगरम

**सूची II**

(1) वस्त्र व्यापारी संघटन

(2) समुद्री व्यापारी संघटन

(3) तेल-तूप पुरवठादार संघटन

(4) तेल व्यापारी संघटन

**पर्याय :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (2) | (1) | (4) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (1) | (3) | (2) | (4) |
| (D) | (4) | (1) | (2) | (3) |

27. 'मत्तविलासप्रहसन'चा लेखक खालीलपैकी कोणता राज्यकर्ता होता ?

(A) महेंद्रवर्मन-I

(B) भोज

(C) अमोघवर्ष

(D) पुलकेशी-II

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



28. Find the incorrect pair :
(1) Vellar – Farmers
(2) Kaniyudaiyar – Land Owners
(3) Ulkudi – Traders and Moneylenders
(4) Nattar – Members of Nadu

**Options :**
(A) Only (3)
(B) (1) and (2)
(C) Only (2)
(D) (2) and (4)

29. Match the following :

**List I**
(*a*) Ur
(*b*) Sabha
(*c*) Nagaram
(*d*) Tanayur

**List II**
(1) Organization in Brahmadeya village
(2) Village organization dominated by traders
(3) Distinct status from Nadu
(4) Village assembly with farmers' dwellings

**Options :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (2) | (3) | (4) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (2) | (1) | (3) | (4) |
| (D) | (4) | (1) | (2) | (3) |

28. चुकीची जोडी शोधा :
(1) वेल्लार – शेतकरी
(2) कनियूदईयार – जमीन मालक
(3) उलकुडी – व्यापारी व सावकार
(4) नट्टार – नाडूचे सदस्य

**पर्याय :**
(A) फक्त (3)
(B) (1) व (2)
(C) फक्त (2)
(D) (2) व (4)

29. जोड्या लावा :

**सूची I**
(*a*) उर
(*b*) सभा
(*c*) नगरम
(*d*) तनयुर

**सूची II**
(1) ब्रह्मदेय ग्रामातील संघटन
(2) व्यापाऱ्यांचा प्रभाव असलेले ग्राम संघटन
(3) नाडूतून स्वतंत्र दर्जा
(4) शेतकऱ्यांचे वस्ती असेलेल्या ग्रामसभा

**पर्याय :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (2) | (3) | (4) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (2) | (1) | (3) | (4) |
| (D) | (4) | (1) | (2) | (3) |

30. 'Yapaniya' sect is associated with .............. religion.
    (A) Buddhist
    (B) Jaina
    (C) Sikh
    (D) Hindu

31. When was the treaty of Kannauj between the Shinde and Holkar and the Wajir Safdarjang was signed, by which Marathas held the responsibility to protect the Mughal from the internal and external enemies ?
    (A) 23 April 1752
    (B) 14 January 1761
    (C) 23 April 1758
    (D) 14 January 1760

32. According to the treaty of Purandar in June 1665 which fort was not surrendered by Chhatrapati Shivaji Maharaj to the Mughals ?
    (A) Kondhana
    (B) Purandar
    (C) Lohgarh
    (D) Pratapgarh

30. 'यापनीय' पंथ खालीलपैकी कोणत्या धर्माशी संबंधित होता ?
    (A) बौद्ध
    (B) जैन
    (C) सीख
    (D) हिंदू

31. अंतर्गत व बाह्य शत्रूंपासून मुघलांचे संरक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांवर देणाऱ्या शिंदे, होळकर व वाजीर सफदरगंज यांच्यातील कनौजच्या तहावर कधी सह्या करण्यात आल्या ?
    (A) 23 एप्रिल 1752
    (B) 14 जानेवारी 1761
    (C) 23 एप्रिल 1758
    (D) 14 जानेवारी 1760

32. छत्रपती शिवाजी महाराजांनी जून 1665 मध्ये केलेल्या पुरंदरच्या तहानुसार कोणता किल्ला मुघलांच्या ताब्यात दिला नाही ?
    (A) कोंढाणा
    (B) पुरंदर
    (C) लोहगड
    (D) प्रतापगड

33. Jayram Pindye's Sanskrit work, the '*Radhamadhav-vilas-champu*' deals mainly with .........
    (A) the career of Raje Shahji Bhosle
    (B) the career of Raje Vyankoji Bhosle
    (C) the career of Chhatrapati Shivaji Maharaj
    (D) the career of Chhatrapati Rajaram Maharaj

34. Raziya Begum was not accepted as ruler and subsequently killed after the rule of 4 years, because .......
    (A) She was brought up by Iltutmish like a son
    (B) She received training in horse riding, shooting and swordsmanship
    (C) She used to attend the court of her father and acquired sufficient experience in statecraft in her youth
    (D) The Turkish nobility thought it below their dignity to be governed by a woman

35. After the death of Muizzuddin Muhammad Ghori in 1206, who succeeded him in Ghazni ?
    (A) Qutub uddin Aibak
    (B) Nasir ad-Din Qabacha
    (C) Khwarizam Shah
    (D) Taj ad-Din Yildiz

33. जयराम पिंड्ये यांचा 'राधामाधवविलासचंपू' हा संस्कृत ग्रंथ मुख्यत्वे ........... यांच्या कारकीर्दीवर केंद्रित आहे.
    (A) राजे शहाजी भोसले
    (B) राजे व्यंकोजी भोसले
    (C) छत्रपती शिवाजी महाराज
    (D) छत्रपती राजाराम महाराज

34. रझिया बेगमला राज्यकर्ती म्हणून स्वीकारण्यात आले नाही आणि चार वर्षांच्या राजवटीनंतर तिची हत्या करण्यात आली, कारण .............
    (A) इल्तुत्मिशाने तिला मुलगा म्हणून वाढवले होते
    (B) तिने घोडेस्वारी, नेमबाजी व तलवारबाजीचे प्रशिक्षण घेतलेले होते
    (C) ती स्वत:च्या वडिलांच्या दरबारामध्ये उपस्थित राहत असे आणि तिने तरुणपणी राजकारणपटुत्वाचा पुरेसा अनुभव घेतला होता
    (D) एका स्त्रीच्या राजवट मान्य करणे तुर्कस्तानी सरदारांना त्यांची अप्रतिष्ठा करणारे वाटले

35. मुईझुद्दीन मुहम्मद घोरी याचं 1206 मध्ये निधन झाल्यानंतर गझनीमध्ये त्याचा उत्तराधिकारी कोण होता ?
    (A) कुतुबुद्दीन ऐबक
    (B) नासिर-अद्-दीन-कबचा
    (C) ख्वारिझम शाह
    (D) ताज अद्-दीन यिल्दिझ

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



36. Percival Spear compares Mughal Emperor Muhammad Shah (1719-48) with ..............
(A) Louis XIV
(B) James I
(C) Louis XV
(D) James II

37. Who did not participate against Vijaynagar in the Battle of Talikot in 1565 ?
(A) Ali Adil Shah
(B) Hussain Nizam Shah
(C) Ibrahim Quli Qutb Shah
(D) Burhan Imad Shah

38. The dispute about the possession of .................. had been a source of constant wars between the Bahamani kingdom and Vijaynagar.
(A) Solapur Fort
(B) Raichur Doab
(C) Goa
(D) Fort of Jinji

39. On which fort Shahji Raje Bhosle attempted the revival of Nizamshahi Sultanate in 1632-33 ?
(A) Daulatabad (Devgiri)
(B) Shivneri
(C) Mahuli
(D) Pemgiri (Shahgarh)

36. पर्सिव्हल स्पीअर यांनी मुघल सम्राट मुहम्मद शाह (1719-48) यांची तुलना ........... यांच्याशी केली.
(A) लुई चौदावा
(B) जेम्स पहिला
(C) लुई पंधरावा
(D) जेम्स दुसरा

37. 1565 साली तालिकोटच्या लढाईत विजयनगरविरोधात कोण लढले नाही ?
(A) अली आदिलशाह
(B) हुसैन निझामशाह
(C) इब्राहिम कुली कुतुबशाह
(D) बुऱ्हाण इमादशाह

38. ................ यावरील मालकीचा वाद बहामनी व विजयनगर साम्राज्यांमधील सततच्या युद्धांना कारणीभूत ठरला.
(A) सोलापूर किल्ला
(B) रायचूर दोआब
(C) गोवा
(D) जिंजीचा किल्ला

39. शहाजीराजे भोसले यांनी 1632-33 या कालावधीत निझामशाहीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न कोणत्या किल्ल्यावर केला ?
(A) दौलताबाद (देवगिरी)
(B) शिवनेरी
(C) महुली
(D) पेमगिरी (शाहगड)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



40. Which of the following Golconda ruler built the famous building Char Minar in Hyderabad ?
   (A) Abul Hasan Qutb Shah
   (B) Muhammad Qutb Shah
   (C) Muhammad Quli Qutb Shah
   (D) Abdullah Qutb Shah

41. According to Amir Khusrau the interest charged for one *tanka* under Delhi Sultanate was ..............
   (A) 12 *Jittal* per year or roughly 20% per year
   (B) One *Jittal* per month or roughly 12% per year
   (C) 12 *Jittal* per year or roughly 12% per year
   (D) Two *Jittal* per month or roughly 15% per year

42. Saqiya was an instrument for ........
   (A) Astronomical calculation
   (B) Mixing of chemical compounds
   (C) Ship building
   (D) Water lifting

43. The six Mughal *subhas* of Deccan did not include ............ and ...........
   (A) Aurangabad and Khandesh
   (B) Berar and Bidar
   (C) Hyderabad and Bijapur
   (D) Arcot and Warangal

40. गोवळकोंड्यातील पुढीलपैकी कोणत्या राज्यकर्त्याने हैदराबादेत प्रसिद्ध चारमिनारचे बांधकाम केले ?
   (A) अबुल हसन कुतुबशाह
   (B) मुहम्मद कुतुबशाह
   (C) मुहम्मद कुली कुतुबशाह
   (D) अब्दुल्ला कुतुबशाह

41. अमीर खुस्रोच्या म्हणण्यानुसार दिल्ली सल्तनतीमध्ये एका तनख्यासाठी .......... इतके व्याज आकारले जात असे.
   (A) वार्षिक 12 जित्तल किंवा वार्षिक सुमारे 20 टक्के
   (B) दरमहा एक जित्तल किंवा वार्षिक सुमारे 12 टक्के
   (C) वार्षिक 12 जित्तल किंवा वार्षिक सुमारे 12 टक्के
   (D) दरमहा दोन जित्तल किंवा वार्षिक सुमारे 15 टक्के

42. साकिया हे .............. चे साधन होते.
   (A) खगोलशास्त्रीय परिगणन
   (B) रासायनिक द्रव्यांचे मिश्रण
   (C) जहाज बांधणी
   (D) पाणी शेंदणे

43. दख्खनेतील सहा मुघल सुभ्यांमध्ये .......... व .............. यांचा समावेश नव्हता.
   (A) औरंगाबाद व खानदेश
   (B) बेरार व बीदर
   (C) हैदराबाद व विजापूर
   (D) आरकोट व वारंगल

www.prepp.in



44. Which of the following Rajput Mansabdars worked as a provincial governor of Agra ?
   (A) Man Singh
   (B) Jai Singh Sawai
   (C) Jaswant Singh
   (D) Raja Bithal Das Gaur

45. Who worked as Mujumdar (Amatya) during the reign of Chhatrapati Sambhaji ?
   (A) Ramchandra Pant Amatya
   (B) Annaji Datto
   (C) Narayan Raghunath
   (D) Aabaji Sondev

46. Nilkanthi Varahas and Sanganeri Varahas were ..............
   (A) Silver coin bearing some symbol
   (B) Silver coin not bearing any symbol
   (C) Gold coin bearing some symbol
   (D) Gold coin not bearing any symbol

47. Which of the following measures was not taken by Balban to check the Mongols ?
   (A) Repaired the forts of Tabarhinda, Sunam and Samana
   (B) Posted a strong force in order to prevent Mongols from crossing Beas
   (C) Preferred to remain in Delhi and avoid distant expeditions
   (D) Married his daughter to a Mongol prince

44. पुढीलपैकी कोणते राजपूत मनसबदार आग्र्याचे प्रांतिक सुभेदार काम करते होते ?
   (A) मान सिंग
   (B) जयसिंग सवाई
   (C) जसवंत सिंग
   (D) राजा बिथलदास गौड

45. छत्रपती संभाजींच्या राजवटीमध्ये कोण मुजुमदार (अमात्य) म्हणून काम करत होते ?
   (A) रामचंद्रपंत अमात्य
   (B) अण्णाजी दत्तो
   (C) नारायण रघुनाथ
   (D) आबाजी सोनदेव

46. नीळकंठी वराह आणि सांगानेरी वराहाचे स्वरूप कसे होते ?
   (A) काही चिन्हे असणारे चांदीचे नाणे
   (B) कोणतेही चिन्ह नसणारे चांदीचे नाणे
   (C) काही चिन्ह असणारे सोन्याचे नाणे
   (D) कोणतेही चिन्ह नसणारे सोन्याचे नाणे

47. मंगोलांना थोपवण्यासाठी बालबान राज्याने पुढीलपैकी कोणत्या उपाययोजना केल्या नाहीत ?
   (A) तबरहिंद, सुनाम व सामना इथल्या किल्ल्यांची डागडुजी केली
   (B) मंगलांना बीआस नदी पार करण्यापासून रोखण्यासाठी शक्तिशाली दले तैनात केली
   (C) दूरच्या मोहिमा टाळून दिल्लीत थांबण्याला प्राधान्य दिले
   (D) स्वत:च्या मुलीचा विवाह एका मंगोल युवराजाशी करून दिला

48. Who provided an administrative blueprint from which Akbar and his ministers later benefitted ?
(A) Qutub-ud-din-Aibak
(B) Babur
(C) Sher Shah Suri
(D) Humayun

49. Sir Thomas Roe was appointed as an official ambassador of ............. in the court of Jahangir in 1615.
(A) James I
(B) Queen Elizabeth
(C) Queen Victoria
(D) George V

50. Mughal and Rajput relations were stretched over the issues of succession in Marwar during the reign of .........
(A) Akbar
(B) Jahangir
(C) Shah Jahan
(D) Aurangzeb

51. Sanjivani, Suvela and Padmavati Machi are located on ............... fort.
(A) Rajgarh
(B) Sinhgad
(C) Purandar
(D) Torna

48. अकबराला व त्याच्या मंत्र्यांना लाभदायक ठरलेला प्रशासकीय आराखडा कोणी तयार केला होता ?
(A) कुतुबद्दीन ऐबक
(B) बाबर
(C) शेरशाह सुरी
(D) हुमायून

49. जहांगिराच्या दरबारात 1615 साली सर थॉमस रो यांना ................ चा अधिकृत राजदूत नेमण्यात आले.
(A) पहिला जेम्स
(B) राणी एलिझाबेथ
(C) राणी व्हिक्टोरिया
(D) पाचवा जॉर्ज

50. ............ च्या राजवटीत मारवाड प्रांत स्वत:च्या साम्राज्यात सामावून घ्यायच्या मुद्द्यांवरून मुघल व राजपूत यांच्यात तणाव निर्माण झाला.
(A) अकबर
(B) जहांगीर
(C) शहाजहाँ
(D) औरंगजेब

51. संजीवनी, सुवेळा आणि पद्मावती माची ...... किल्ल्यावर आहे.
(A) राजगड
(B) सिंहगड
(C) पुरंदर
(D) तोरणा

www.prepp.in



52. In fort architecture under the Marathas, Meta meant ............
    (A) A grain house
    (B) Watch-post
    (C) Uppermost portion of the fort
    (D) The armoury

53. Which of the following statement about Sufis is not correct ?
    (A) They stimulated rapid Indianization of Islam
    (B) They played important role in educational advancement of society
    (C) They brought about reconciliation among Hindus and Muslims
    (D) They did not affect the numerical strength of Muslims in India

54. Which of the following statement about Suhravardi Silsila is not correct ?
    (A) This sect did not believe in excessive austerity
    (B) The foundation in India was laid by Shaikh Bahauddin Zakariya
    (C) This sect did not take part in state politics
    (D) This sect was mostly confined to upper strata of Muslim society

52. मराठा काळातील गिरिदुर्ग स्थापत्यामध्ये मेटा याचा अर्थ ..................
    (A) धान्य कोठार
    (B) टेहळणीचे ठिकाण
    (C) गिरिदुर्गा वरील सर्वात उंच भाग
    (D) शस्त्रागार

53. पुढीलपैकी कोणते वाक्य सुफी संप्रदायाबद्दल सत्य नाही ?
    (A) त्यांनी इस्लाम धर्माचे भारतीयकरण करण्यात योगदान दिले
    (B) त्यांनी समाजात शैक्षणिक प्रगती घडविण्यात महत्त्वाचे योगदान दिले
    (C) त्यांनी हिंदू व मुस्लिमांमध्ये सलोखा निर्माण केला
    (D) त्यांचा भारतातील मुस्लिम लोकसंख्येवर कोणताही परिणाम झाला नाही

54. पुढीलपैकी कोणते वाक्य सुहरावर्दी सिलसिला-बद्दल सत्य नाही ?
    (A) त्यांचा दारिद्र्यमय जीवनशैलीवर विश्वास नव्हता
    (B) भारतामध्ये या पंथाची स्थापना शेख बहाउद्दीन जकारिया यांनी केली
    (C) त्यांनी राजकारणात सहभाग घेतला नाही
    (D) हा पंथ मुख्यत: मुस्लिम समाजाच्या उच्च वर्गापर्यंत सीमित होता

55. Which of the following statement about Saint Kabir is not true ?
(A) He was initiated into the bhakti cult by Ramanuja
(B) He denounced the brahmins and Maulavi alike
(C) He opposed idol worship, caste system and untouchability
(D) He advised his followers to earn livelihood by performing the duties of householders

56. Apart from Sikh Gurus, the Guru Granth Sahib includes writings of Muslim Saint .....................
(A) Shaikh Tajuddin
(B) Mian Mir
(C) Shaikh Farid
(D) Shaikh Ahmed Sirhindi

57. Which of the following organised his Sikh followers into a militant community-Khalsa ?
(A) Guru Arjan
(B) Guru Gobind Singh
(C) Guru Nanak
(D) Guru Har Krishan

55. संत कबीर यांच्याबाबत पुढीलपैकी कोणते विधान यथातथ्य नाही ?
(A) त्यांना रामानुजांनी भक्तिपंथाची दीक्षा दिली
(B) त्यांनी ब्राह्मण आणि मौलवी यांची सारखीच निंदा केली
(C) त्यांनी मूर्तिपूजा, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेला विरोध केला
(D) त्यांनी गृहस्थाची कर्तव्ये पार पाडून उदरनिर्वाह करण्याचा उपदेश आपल्या अनुयायांना केला

56. गुरू ग्रंथ साहेबमध्ये शीख गुरूंच्या व्यतिरिक्त पुढील मुस्लिम संताच्या रचना समाविष्ट आहेत :
(A) शेख ताजुद्दिन
(B) मियाँ मीर
(C) शेख फरीद
(D) शेख अहमद सिरहिंदी

57. खालसा नावाच्या लष्करी संघटनेत आपल्या शीख अनुयायांना संघटित करण्याचा प्रयत्न कोणी केले ?
(A) गुरू अर्जन
(B) गुरू गोबिंद सिंघ
(C) गुरू नानक
(D) गुरू हरकिशन

Prepp Your Personal Exams Guide



58. Which one of the following statements regarding Valangai and Idangai is correct ?
    (A) This social classification was based on a language
    (B) This social division transcended the isolation of Nadu localities
    (C) These social classes were never hostile to each other
    (D) Valangai meant 'left-handed' and Idangai meant 'right-handed'

59. ................. cluster of temple monuments has made use of arcuate technique with both true and false arches.
    (A) Khajuraho
    (B) Mamallapuram
    (C) Verul
    (D) Pattadakal

60. Guru Nanak set up his *dehra* at ......
    (A) Nanded
    (B) Amritsar
    (C) Kartarpur
    (D) Talwandi

61. The Dastak (Free Pass) for the private trade of the East India Company's servants was finally abolished in ......
    (A) 1786
    (B) 1773
    (C) 1775
    (D) 1774

58. वल्लंगाई आणि इडंगाई यांच्याबद्दल पुढीलपैकी कोणते वाक्य योग्य आहे ?
    (A) हे सामाजिक विभाजन भाषेच्या आधारे अस्तित्वात आले
    (B) हे सामाजिक विभाजन नाडू प्रदेशांचे अलगीकरण ओलांडत होते
    (C) या सामाजिक घटकांमध्ये कधीही संघर्ष नव्हता
    (D) वल्लंगाई म्हणजे 'डाव्या हाताचे' व इडंगाई म्हणजे 'उजव्या हाताचे'

59. ........................ या मंदिरसमूहामध्ये खऱ्या आणि खोट्या कमानी आणि घुमटांसह धनुराकृती तंत्राचा वापर केला आहे.
    (A) खजुराहो
    (B) मामल्लपुरम्
    (C) वेरुळ
    (D) पट्टडकल

60. गुरू नानकांनी त्यांचा डेरा ........ येथे स्थापन केला.
    (A) नांदेड
    (B) अमृतसर
    (C) करतारपूर
    (D) तळवंडी

61. ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्मचाऱ्यांना खासगी व्यापारासाठी मुक्त परवाना म्हणून दिले जाणारे 'दस्तक' हे शेवटी ....... यावर्षी रद्द केले गेले.
    (A) 1786
    (B) 1773
    (C) 1775
    (D) 1774

62. Which of the following comprised one of the main inspirations for Lord Macaulay's codification of the Indian Penal Code [IPC] ?
   (A) The revision of the Islamic Law by Cornwallis
   (B) Hastings' observations on Hindu Law
   (C) The Indological submissions of William Jones
   (D) The writings of James Mill

63. By which treaty in 1748, was Madras exchanged with Cape Breton Island by the British with the French ?
   (A) Treaty of Pondicherry
   (B) Treaty of Trichonopoly
   (C) Treaty of Aix-la-Chapelle
   (D) Treaty of Arcot

64. In which year did the Mughal Emperor give the Farman for free trade in Bengal to the East India Company ?
   (A) 1724
   (B) 1720
   (C) 1717
   (D) 1718

62. लॉर्ड मेकॉलेने केलेल्या भारतीय दंडविधानाच्या संहितीकरणाची मुख्य प्रेरणा पुढीलपैकी कोणती होती ?
   (A) कॉर्नवालिसने केलेले इस्लामी कायद्याचे पुनरावलोकन
   (B) हेस्टिंग्जने हिंदू कायद्याबाबत मांडलेली निरीक्षणे
   (C) विलियम जोन्सचे भारतविद्याविषयक सिद्धांत
   (D) जेम्स् मिलचे लेखन

63. 1748 मध्ये कोणत्या तहानुसार इंग्रजांनी केप ब्रेटन बेटाच्या बदल्यात फ्रेंचांकडून मद्रास मिळवले ?
   (A) पाँडिचेरीचा तह
   (B) त्रिचनापल्लीचा तह
   (C) एक्स-ला-चापेलचा तह
   (D) आरकोटचा तह

64. बंगालमध्ये मुक्त व्यापार करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीला मुघल बादशहाने कोणत्या वर्षी फर्मान दिले ?
   (A) 1724
   (B) 1720
   (C) 1717
   (D) 1718

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



65. Which of the following correctly describes the position of the traders, bankers and shopkeepers towards the Rebel Sepoys in Delhi in 1857 ?
    (A) They supported the rebels
    (B) They supported the rebels reluctantly
    (C) They were neutral towards the rebels
    (D) They openly opposed the rebels

66. Burma surrendered Manipur to the English after which of the following ?
    (A) Treaty of Yandabo, 1826
    (B) Treaty of Rangoon, 1852
    (C) Treaty of Arakan, 1828
    (D) Treaty of Mandala, 1878

67. One of the main reasons why the rebels of 1857 in Delhi failed to defeat the British outside the city walls despite launching fierce attacks was ?
    (A) The rebel attacks on the British were disorganised
    (B) The Emperor did not lead the rebel army
    (C) The city population did not support the rebels
    (D) The British gained numerical superiority on the field

65. 1857 मध्ये बंडकरी सैनिकांच्या बाबतीत व्यापारी, पेढीमालक आणि दुकानदारांची भूमिका पुढीलपैकी कोणत्या विधानातून यथातथ्यपणे चित्रित होते ?
    (A) त्यांनी बंडकऱ्यांना पाठिंबा दिला
    (B) त्यांनी बंडकऱ्यांना नाराजीनेच पाठिंबा दिला
    (C) त्यांनी बंडकऱ्यांबाबत अलिप्तता बाळगली
    (D) त्यांनी बंडकऱ्यांना उघडपणे विरोध केला

66. ब्रह्मदेशाने (म्यानमार) कोणत्या तहानंतर मणिपूर इंग्रजांच्या हवाली केले ?
    (A) यांदाबोचा तह, 1826
    (B) रंगूनचा तह, 1852
    (C) आराकानचा तह, 1828
    (D) मंडालेचा तह, 1878

67. 1857 मध्ये दिल्लीच्या तटबंदीच्या बाहेर जोरदार हल्ला करूनही बंडकऱ्यांना इंग्रजांचा पराभव करता आला नाही. याचं प्रमुख कारण कोणते ?
    (A) बंडकऱ्यांचे आक्रमण विस्कळित स्वरूपाचं होतं
    (B) बंडकऱ्यांच्या सेनेचं नेतृत्व बादशहाने केलं नाही
    (C) शहरातल्या नागरिकांनी बंडकऱ्यांना पाठिंबा दिला नाही
    (D) ब्रिटिशांनी रणभूमीवर संख्यात्मक वरचष्मा मिळवला

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



68. In March 1757, the British conquered this French Colony in India :
(A) Chandra Nagar
(B) Mahe
(C) Pondicherry
(D) Karikal

69. Industries Department was established in .......... and Industrial Commission was appointed in .......
(A) 1904 and 1915
(B) 1905 and 1916
(C) 1906 and 1917
(D) 1907 and 1918

70. In 1765, by which of the following right, East India Company was involved into administration of Civil Justice besides the power to collect revenues in east province of Bengal-Bihar-Orissa ?
(A) Kotwali
(B) Nizambi
(C) Diwani
(D) Abwai

71. At the time of voting in the 1937 elections, hoping for economic reforms, the voters in Pratapgadh, U.P. burnt down these documents :
(A) Jurmana
(B) Bedakhli
(C) Vakalatnama
(D) Girvikhat

68. मार्च 1757 मध्ये इंग्रजांनी भारतातील कोणती फ्रेंच वसाहत जिंकून घेतली ?
(A) चंद्र नगर
(B) माहे
(C) पांडिचेरी
(D) कारिकल

69. उद्योग विभागाची स्थापना .............. मध्ये तर उद्योग आयोगाची स्थापना ........... मध्ये झाली.
(A) 1904 आणि 1915
(B) 1905 आणि 1916
(C) 1906 आणि 1917
(D) 1907 आणि 1918

70. 1765 मध्ये खालीलपैकी कोणत्या अधिकारात ईस्ट इंडिया कंपनीला बंगाल-बिहार-ओरीसा पूर्व प्रांतात नागरी प्रशासनासोबत थेट महसूल गोळा करण्याची परवानगी मिळाली ?
(A) कोतवाली
(B) निजामी
(C) दिवाणी
(D) अबवाबी

71. आर्थिक सुधारणांच्या आशेवर असलेल्या मतदात्यांनी 1937 च्या निवडणुकीत मतदान करताना प्रतापगढ, यू. पी. मध्ये कोणती कागदपत्रे जाळली ?
(A) जुर्मनामा
(B) बेदखली
(C) वकालतनामा
(D) गिरवीखत

72. 'Dnyan Prasarak Mandali' was founded by ......................
(A) Jagannath Shankar Sheth
(B) Gopal Ganesh Agarkar
(C) Phirozshah Mehta
(D) Dadabhai Naoroji

73. Who raised the issue of Farmers' representation in 1895 by erecting a Poster of the distraught farmer outside the pandal of the Indian National Congress in 1895 ?
(A) Jyotirao Phule
(B) Krishnarao Bhalekar
(C) Mukundrao Patil
(D) Narayan Meghaji Lokhande

74. Who is the author of the reform based Marathi poem called Tamasha ?
(A) Dhondo Keshav Karve
(B) Dhondiram Namdeo Kumbhar
(C) Tukdoji Maharaj
(D) V.D. Savarkar

75. In 1931, Prashant Chandra Mahalanobis set up the ............ in Calcutta.
(A) National Sample Survey
(B) Central Statistical Organisation
(C) Planning Commission of India
(D) Indian Statistical Institute

72. 'ज्ञान प्रसारक मंडळी' ची स्थापना ......... यांनी केली.
(A) जगन्नाथ शंकर शेठ
(B) गोपाळ गणेश आगरकर
(C) फिरोजशाह मेहता
(D) दादाभाई नौरोजी

73. 1895 मध्ये ............. यांनी भारतीय राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या दारात गांजलेल्या शेतकऱ्याचे पोस्टर उभारून शेतकऱ्यांच्या प्रतिनिधित्वाचा मुद्दा उपस्थित केला.
(A) जोतिराव फुले
(B) कृष्णराव भालेकर
(C) मुकुंदराव पाटील
(D) नारायण मेघाजी लोखंडे

74. तमाशा नावाच्या सुधारणावादी काव्याचे लेखक कोण होते ?
(A) धोंडो केशव कर्वे
(B) धोंडिराम नामदेव कुंभार
(C) तुकडोजी महाराज
(D) वि. दा. सावरकर

75. 1931 मध्ये प्रशांतचंद्र महालोनोबीस यांनी कलकत्त्यात .................. ची स्थापना केली.
(A) नॅशनल सॅम्पल सर्व्हे
(B) सेन्ट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनाइझेशन
(C) प्लॅनिंग कमिशन ऑफ इंडिया
(D) इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टियूट

76. Which of the following Commission was appointed in 1917 to survey and report the problems of higher education; which commented that the Act of 1904 made 'the Indian universities among the most completely governmental universities in the world.'

(A) Hunter Commission

(B) Frazer Commission

(C) Anthony Commission

(D) Sadler Commission

77. Who among the following wrote a history on the evolution of the institution of marriage in Marathi in 1926 ?

(A) R.G. Bhandarkar

(B) V.K. Rajwade

(C) P.V. Kane

(D) R.L. Mitra

78. The Criminal Law Amendment Act, 1932 gave the following right to the government ..................

(A) to forcefully arrest for taking part in rally

(B) to hang the criminal without trial

(C) to control anti-government press

(D) to confiscate disputed property

76. 1917 मध्ये खालीलपैकी कोणत्या आयोगांची नियुक्ती उच्च शिक्षणातील समस्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी झाली होती ? 1904 च्या कायद्यावर या आयोगाचे भाष्य केले होते की, 'संपूर्णत: शासनाच्या आहारी गेलेल्या जगातील विद्यापीठांमध्ये भारतीय विद्यापीठे सर्वाधिक आहेत.'

(A) हंटर आयोग

(B) फ्रेजर आयोग

(C) अँथनी आयोग

(D) सॅडलर आयोग

77. खालीलपैकी कोणी विवाहसंस्थेच्या विकासाच्या इतिहासावर, 1926 मध्ये मराठीमध्ये लिखाण केले ?

(A) रा. गो. भांडारकर

(B) वि. का. राजवाडे

(C) पां. वा. काणे

(D) रा. ला. मित्रा

78. अपराधी कायदा संशोधन अधिनियम, 1932 ने खालीलपैकी कोणता अधिकार शासनाला प्रदान केला ?

(A) मोर्चात भाग घेतल्या कारणाने जबरदस्तीने अटक करणे

(B) अपराध्याला न्यायालयात न नेता फाशी देणे

(C) शासनाविरुद्ध विचार-वक्तव्ये प्रसिद्ध करणारे वृत्तपत्र यांचे संयमन करणे

(D) विवादित मालमत्ता जप्त करणे

79. The main feature of Memorandum of Holt Mackenzie of 1822 was ......
(A) Support permanent settlement
(B) Combining features of zamindari and ryotwari
(C) Introduction of the post of 'Collector'
(D) Introduction of the post of 'Tahasildar'

80. In 1929, which party was formed by Akram Khan, Fazlul Haq and Abdur Rahim to protect the interests of the Bargadars who were rent farmers in Bengal ?
(A) Unionist Party
(B) Riyasati Praja Mandal
(C) Jotedar Party
(D) Bengal Kisan Sabha

81. In 1944, the new name Dravida 'Munnetra Kazhagam' was given to which of the following organisation ?
(A) Telugu Republic Party
(B) Madras Kisan Party
(C) Madras Untouchables' Party
(D) Justice Party

82. During the Second Five-Year Plan, three separate agreements were signed with foreign powers for the construction of steel plants. Which is the incorrect pair ?
(A) Germans – Rourkela
(B) Russians – Bhilai
(C) British – Durgapur
(D) Americans – Bokaro

79. खालीलपैकी कोणते 1822 च्या हॉल्ट मॅकेन्झी निवेदनाचे प्रमुख वैशिष्ट्य होते ?
(A) कायमधारा पद्धतीचे समर्थन
(B) जमीनदारी आणि रयतवारी पद्धतींच्या वैशिष्ट्यांचे मिश्रण
(C) 'कलेक्टर' या पदाची निर्मिती
(D) 'तहसीलदार' या पदाची निर्मिती

80. 1929 साली बंगालमध्ये अक्रम खान, फझलुल हक आणि अबदुर रहीम यांनी खंडाने शेती करणाऱ्या बरगादारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कोणता पक्ष स्थापन केला ?
(A) यूनिअनिस्ट पार्टी
(B) रियासती प्रजा मंडल
(C) जोतेदार पार्टी
(D) बंगाल किसान सभा

81. 1944 मध्ये 'द्रविड मुनेत्र कळघम' हे नाव खालीलपैकी कोणत्या संघटनेला दिले गेले ?
(A) तेलगू रिपब्लिक पार्टी
(B) मद्रास किसान पार्टी
(C) मद्रास अनटचेबल्स् पार्टी
(D) जस्टीस पार्टी

82. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत परदेशी सत्तांसह पोलाद निर्मिती कारखाने उभारण्याचे तीन करार केले गेले. त्यापैकी पुढील जोड्यांपैकी कोणती अयोग्य आहे ?
(A) जर्मन — राऊरकेला
(B) रशियन — भिलाई
(C) ब्रिटिश — दुर्गापूर
(D) अमेरिकन — बोकारो

83. ................ was a founder member of the 'Goa Youth League'.
(A) Beatris de Menzes Braganza
(B) Ram Manohar Lohiya
(C) Mohan Ranade
(D) Dayanand Bandodkar

84. Around 1840-41, ............. freedom fighter had conquered the fort of Badami with the help of other soldiers and hoisted the flag of the Chhatrapati of Satara on this fort.
(A) Sevaram Bhill
(B) Narsingrao Petkar
(C) Lahuji Salve
(D) Vasudeo Balwant Phadke

85. Hasrat Mohani, Josh Malihabadi, Firaq Gorakhpuri and Krishan Chander were the leading figures of :
(A) Indian Peoples' Theatre Association
(B) Progressive Writers Association
(C) Hindi Sahitya Parishad
(D) Urdu Sahitya Sansad

86. In which following year Communist Party of India was declared an illegal organisation ?
(A) 1934
(B) 1935
(C) 1936
(D) 1937

83. गोवा यूथ लीगच्या संस्थापक सदस्यांपैकी हे एक होते :
(A) बेआत्रिस द मेन्झेस ब्रगान्झा
(B) राम मनोहर लोहिया
(C) मोहन रानडे
(D) दयानंद बांदोडकर

84. 1840-41 दरम्यान या स्वातंत्र्य लढ्यातील सेनानीने इतर सैनिकांच्या साहाय्याने बदामीचा किल्ला ताब्यात घेतला आणि तेथे साताऱ्याच्या छत्रपतींचा झेंडा फडकवला.
(A) सेवाराम भिल्ल
(B) नरसिंगराव पेटकर
(C) लहूजी साळवे
(D) वासुदेव बळवंत फडके

85. हसरत मोहानी, जोश मलिहाबादी, फिराक गोरखपुरी आणि क्रिशन चंदर हे पुढील संघटनेचे आघाडीचे सदस्य होते.
(A) इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन
(B) प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन
(C) हिंदी साहित्य परिषद
(D) उर्दू साहित्य संसद

86. खालीलपैकी कोणत्या वर्षी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाला अवैध घोषित केले होते ?
(A) 1934
(B) 1935
(C) 1936
(D) 1937

87. Emergence of 'Parallel Governments' in some parts of the country was a significant feature of .....................
(A) Civil Disobedience Movement
(B) Vangbhang Movement
(C) Dam Affected People's Movement
(D) Quit India Movement

88. Voters from ............... were the first to exercise their right to vote in the first parliamentary elections in Independent India held in 1951-52.
(A) Himachal Pradesh
(B) Arunachal Pradesh
(C) New Delhi
(D) Andaman and Nicobar Islands

89. Who amongst the following leaders declared in July 1921 that, 'it was religiously unlawful for Muslims to continue in the British army' ?
(A) Gandhiji
(B) Shaukat Ali
(C) Maulana Azad
(D) Mohammed Ali Jinnah

90. Which party was launched by C. Rajagopalachari in 1959 to protest against the Congress policies ?
(A) Justice Party
(B) Swatantra Party
(C) Janata Party
(D) Dravida Munnetra Kazagham

87. खालीलपैकी कोणत्या चळवळीचे वैशिष्ट्य 'प्रति सरकार' हे होते ?
(A) सविनय कायदेभंग चळवळ
(B) वंगभंग चळवळ
(C) धरणग्रस्त लोकांची चळवळ
(D) चलेजाव चळवळ

88. 1951-52 साली झालेल्या स्वतंत्र भारतातील पहिल्या संसदीय निवडणुकांत ............ मधील मतदारांनी सर्वात आधी मतदानाचा हक्क बजावला.
(A) हिमाचलप्रदेश
(B) अरुणाचलप्रदेश
(C) नवी दिल्ली
(D) अंदमान निकोबार बेटे

89. पुढीलपैकी कोणत्या नेत्याने जुलै 1921 मध्ये जाहीर केले की 'ब्रिटिश सैन्यात कार्यरत राहणे हे मुस्लिमांसाठी धार्मिकदृष्ट्या बेकायदेशीर होते' ?
(A) गांधीजी
(B) शौकत अली
(C) मौलाना आझाद
(D) मोहम्मद अली जिन्ना

90. 1959 साली सी. राजगोपालाचारींनी कॉन्ग्रेसच्या धोरणांना विरोध करण्यासाठी कोणता पक्ष स्थापन केला ?
(A) जस्टिस पार्टी
(B) स्वतंत्र पार्टी
(C) जनता पार्टी
(D) द्रविड मुन्नेत्र कळघम

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



91. Which of the following was a characteristic of renaissance Historiography ?
    - (A) History as a history of human passions
    - (B) History as a history of nature
    - (C) History as a history of matter
    - (D) History as a history of the Church

92. Which of the following is not a characteristic of Church Historiography ?
    - (A) It is Universal
    - (B) It is Providential
    - (C) It is Local
    - (D) It is periodized

93. What is teleology in historical studies ?
    - (A) The study of ancient telecommunication methods and technologies
    - (B) The analysis of historical events based on their inherent purpose or end goal
    - (C) The examination of historical artifacts related to early telegraphy
    - (D) A term describing the chronological order of historical development by Aryabhat

91. पुनरुज्जीवनकाळातील इतिहासलेखनशास्त्राचे वैशिष्ट्य म्हणजे :
    - (A) इतिहास हा मानवी इच्छांचा इतिहास
    - (B) इतिहास म्हणजे निसर्गाचा इतिहास
    - (C) इतिहास म्हणजे जडतत्त्वाचा इतिहास
    - (D) इतिहास म्हणजे चर्चचा इतिहास

92. पुढीलपैकी चर्च इतिहासलेखनशास्त्राचे वैशिष्ट्य नसणारे विधान कोणते ?
    - (A) ते वैश्विक आहे
    - (B) ते नियतिवादी आहे
    - (C) ते स्थानिक आहे
    - (D) त्याचे कालखंड पडतात

93. ऐतिहासिक अभ्यासामध्ये उद्देश्यवाद म्हणजे काय ?
    - (A) प्राचीन दूरसंचार पद्धती आणि तंत्रज्ञानाचा अभ्यास
    - (B) ऐतिहासिक घटनांचे विश्लेषण त्यांच्या मूळ उद्देश किंवा अंतिम ध्येयावर आधारित
    - (C) सुरुवातीच्या टेलीग्राफीशी संबंधित ऐतिहासिक कलाकृतींचे परीक्षण
    - (D) ऐतिहासिक घडामोडींच्या कालक्रमाचे वर्णन करणारी संज्ञा

www.prepp.in



94. Which of the following is a part of the probability sampling method of data collection ?
   (A) Quota Sampling
   (B) Purposive Sampling
   (C) Self-selection Sampling
   (D) Simple Random Sampling

95. Which of the following is not basic assumption of research ?
   (A) Cause and Effect Relationship
   (B) Sequence in Social Phenomena
   (C) Action Research
   (D) Possibility of Ideal Types

96. N.V. Joshi's 'Description of the City of Pune' (1868) can be included in which of the following categories of historiography ?
   (A) History from below
   (B) Local history
   (C) Provincial history
   (D) National history

97. Which historian has written history considering the concept of civilization as the most important unit ?
   (A) Ranjit Guha
   (B) Arnold Toynbee
   (C) Leopold von Ranke
   (D) James Mill

94. संभाव्यता नमुनानिवड पद्धतीने माहिती गोळा करण्याच्या प्रक्रियेतील भाग म्हणजे :
   (A) प्रातिनिधिक नमुनानिवड
   (B) हेतुपुरस्सर नमुनानिवड
   (C) स्वत:निर्वाचन नमुनानिवड
   (D) साधी यादृच्छिक नमुनानिवड

95. पुढीलपैकी काय संशोधनाचे पायाभूत गृहीतक नाही ?
   (A) कार्यकारण संबंध
   (B) सामाजिक घटितांचा कालानुक्रम
   (C) कृतिमूलक संशोधन
   (D) आदर्श प्रारूपांची शक्यता

96. एन.व्ही. जोशी यांचे 'पुणे शहराचे वर्णन' (1868) इतिहासलेखनाच्या खालील वर्गात समाविष्ट केले जाऊ शकते :
   (A) तळाकडून इतिहास
   (B) स्थानिक इतिहास
   (C) प्रांतीय इतिहास
   (D) राष्ट्रीय इतिहास

97. कोणत्या इतिहासकाराने सभ्यता ही संकल्पना सर्वात महत्त्वाची एकक मानून इतिहास लिहिला आहे ?
   (A) रणजीत गुहा
   (B) आर्नल्ड टॉयन्बी
   (C) लिओपोल्ड वॉन रांके
   (D) जेम्स मिल

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



98. In Ranke's view, what is the primary role of the historian ?
(A) To entertain and inform the audience
(B) To interpret and analyse historical events
(C) To uncover and state the historical facts
(D) To critique and challenge the traditional narratives

99. What is the primary critique of Subaltern school regarding the discipline of history ?
(A) Traditional historical narratives are lacking in a proper methodology of history
(B) Traditional historical narratives are focused on political history alone
(C) Traditional historical narratives marginalized certain groups of people
(D) Traditional historical narratives are not scientific enough

100. According to R.G. Collingwood, historical knowledge is :
(A) Absolute and unchanging
(B) Subjective and evolving
(C) Scientific and empirical
(D) Limited to recorded facts

98. रांके यांच्या मते इतिहासकाराची प्राथमिक भूमिका काय आहे ?
(A) प्रेक्षकांचे मनोरंजन आणि माहिती देण्यासाठी
(B) ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावणे आणि त्यांचे विश्लेषण करणे
(C) ऐतिहासिक तथ्ये उघड करणे आणि ते सांगणे
(D) पारंपारिक कथांवर टीका करणे आणि त्यांना आव्हान देणे

99. इतिहास या ज्ञानशाखेबाबत सबाल्टर्न विचारांच्या लेखकांचा प्रमुख आक्षेप काय आहे ?
(A) पारंपारिक ऐतिहासिक लेखनामध्ये इतिहासाच्या योग्य पद्धतीशास्त्राचा अभाव आहे
(B) पारंपारिक ऐतिहासिक लेखनामध्ये केवळ राजकीय इतिहासावर केंद्रित आहेत
(C) पारंपारिक ऐतिहासिक लेखनामध्ये लोकांच्या काही गट उपेक्षित राहतात
(D) पारंपारिक ऐतिहासिक लेखनामध्ये वैज्ञानिकतेचा अभाव आहे

100. आर.जी. कॉलिंगवुड यांच्या मते, ऐतिहासिक ज्ञान म्हणजे :
(A) निरपेक्ष आणि अपरिवर्तनीय
(B) व्यक्तिनिष्ठ आणि विकसित होत जाणारे
(C) वैज्ञानिक आणि अनुभवनिष्ठ
(D) नोंदवलेल्या तथ्यांपुरते मर्यादित

www.prepp.in



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide